**Historicity Research Journal** **Impact Factor : 1.4152 (UIF)**
**ISSN : 2393-8900** **Volume - 3 | Issue - 5 | January – 2017**

# अभिजात बौध्द शिल्पसौंदर्य : अजंठा

**डॉ. संजय गायकवाड**
**विभाग प्रमुख-इतिहास , मा. ह. महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब.**



**प्रस्तावनाः—**

मूर्तीकलेची माहिती मत्स्यपुराण, अग्निपुराण, स्कंदपुराण, पद्मपुराण, लिंगपुराण, भविष्यपुराण, विष्णुपुराण इ. ग्रंथात मूर्ती शास्त्रांची माहिती मिळते. सुंप्रेमदायम, वैश्वानसागम, अंशुभदागम या ग्रंथात मूर्ती कलेची व मूर्ती विज्ञानाची माहिती मिळते समरांगसूत्रधार, विश्वकर्मावतार या ग्रंथात दक्षिण भारतीय मूर्ती कलेची माहिती मिळते. (०१ पृ.क्र.१५७,१५८) रामायण, महाभारत पुराणे यामध्ये मूर्ती कलेविषयी माहिती मिळते. (२ प्र.क्र. १४४-१४६). शिल्पशास्त्राच्या दृष्टीने सांप्रत अपराजितपृच्छा, अपराजित वास्तुशास्त्र,मानसार, मानसोल्लास समरांगणसूत्र, मयमत आणि शिल्परत्न इत्यादी महत्वाचे व प्रसिध्द ग्रंथ आहेत. (०२ पृ.क्र.४४५) भारतीय संस्कृतीमध्ये शिल्पशास्त्राचे विश्वकर्मा आणि महर्षी शुक्राचार्य हे आद्यप्रवर्तक आहेत. कोणत्याही मूर्तीच्या अथवा कलाशिल्पाच्या घडणावळीत तालमानला काय महत्वाचे स्थान दिलेले आहे त्याच्या परिणामांचा किंवा मोजमापाच्या आधारानेच पाषाणखंडातून मूर्ती किंवा कलाशिल्प साकार केले जाते. शिल्पासंहितेने ठरवून दिलेली परिमाणे किंवा मोजमापे हाताची मूठ आणि अंगुली (बोटे) अशी नैसर्गिक असतात. (३ पृ.क्र.४०) कश्यप आणि अगस्त हे महान मूर्ती शास्त्रज्ञ समजले जातात.कश्यप यांचा ``अशुमदभेद`` या ग्रंथात आणि अगस्ती यांच्या ``आगस्तीय संकल्पाधिकार`` या ग्रंथात मूर्ती शास्त्राविषयी माहिती मिळते.(०२ पृ.क्र.४४५) भारतीय कलाकारांनी सौंदर्यवादी दृष्टीकोन व निसर्गातील विविध तत्वांना कलेत स्थान देवून मूर्तीकलेच्या आविष्कारातून आदर्शवादाची जाणीव करुन दिली आहे. (०१ पृ.क्र.१५६) शिल्पकारात धैर्य, संयम, एकाग्रता, प्रतिभाशाली, हस्तकौशल्य असल्यानेच शिल्पकलेत शृंगार, हास्य, करुण, शांत, अद्‌भूत या भावरसा बरोबर वीर, रौद्र, बीभत्स आणि भयानक इत्यादी भावभावना ओतप्रोत उतरवत असतो. मानवाच्या स्थायी भावभावना आपण मूर्तीवर आरोपित करतो (०३ पृ.क्र.१८) भारतीय मूर्तीकलेचा उगम देव पूजेतून झाला. प्राचीन काळातील बहुतेक मूर्ती देवदेवतांच्या असून त्या पूजेच्या उद्देशाने बनविलेल्या आहेत. (०२ प्र.क्र. ४४४)भारतीय संस्कृती आणि जीवन प्रणाली शिल्पामधून साकार करण्याचे श्रेय शिल्पकारांना आहे. शिल्पकाराच्या शिल्पलिपी कमल कालिकेच्या शालीन भाषेची आहे. (०३ प्र.क्र. १९) मूर्तीच्या चेहऱ्यावरील भावभावनातून आंतरिक भावनाचे प्रतिबिंब स्पष्ट करण्यात येते. दैवी व आध्यात्मिक भावना लौकीक माध्यमातून अभिव्यक्त करण्यात आल्या आणि मूर्तीच्या शरीरसोष्ठत्वाव्दारे त्या देवतेचे वेगळेपण व वैशिष्ट्ये प्रतिबिंबीत करण्यात आले आहे. (०१ प्र.क्र.१५४)

महाराष्ट्रातील निरनिराळ्या भागातील डोंगरामध्ये बौध्द भिक्षूकरीता शैलगृहे खोदण्यात आली. भाजे, कोंडाणे, औरंगाबाद, पितळखोरे, नाशिक, कार्ले, बेडसे, महाकाली आणि कान्हेरी या सुरुवातीच्या टप्प्यातील प्रमुख केंद्रे होती. गौतमीपुत्र सातकर्णीच्या काळानंतर माणसांची आणि प्राण्यांची मूर्तीशिल्पे मोठ्या संख्येने आढळतात. (०४ प्र.क्र. १८९) सातवाहन शिल्पांच्या किंवा पूर्वेइतिहासिक कलेच्या या टप्प्यात पशुपक्ष्यांनी युक्त अशा उभ्या कमलपट्टाची प्रयोजन आहे. येथे कोरलेल्या मानवाकृती त्यांचे पोशाख, अलंकार याची धाटणी आधिसारखी आहे. मात्र चेहऱ्याची ठेवण कांहीशी लाकडी मुखवट्यासारखी किंवा आदिवासींच्या उठाव शिल्पासारखी आहे.गौतमीपुत्र सातकर्णीच्या नंतरच्या काळात माणसाची आणि प्राण्यांची शिल्पे लेण्यामध्ये ठळकपणे आणि मोठ्या संख्येत आढळतात. (०४ प्र.क्र.१९२) गुप्तकाळातील कलानिर्मिती म्हणजे मथुरा व गांधार परंपरांच्या मिश्रणातून उत्पन्न झालेल्या एक अतिशय प्रगल्भ व परिणत अविष्कार समाजावा लागतो. दोन्ही परप्रांतातील चांगल्या गोष्टी एकत्र करुन दोन्हीपेक्षा निराळा असा एक अतिशय सुबक घाट कलाकाराने निर्माण केला आहे. महायान, जैन, हिंदू या तीनही पंथाच्या आख्यायिका देवदेवतांच्या लीला सर्वज्ञात झाल्याने कलाकाराने विविध विषय उपलब्ध झाल्याने गौतम बुध्दाच्या अतिशय सुबक प्रतिमा तयार केल्या. गुप्तकालीन बुध्दाचा चेहरा योगसाधनेत मग्न अशा पुरुषाचा मानवी आणि दैवी यातील फरक व्यक्त करण्याचा कलाकाराचा मार्ग होता. हा इतका अचूक ठरला की, यापुढे देवदेवतांच्या मूर्तीच्या मुखावर सर्वत्र असा भाव उतरवण्यासाठी कलाकार पराकाष्ठा घेवू लागला. (०५ प्र.क्र.४५) वाकाटक राजांनीही स्थापत्य, शिल्प आणि चित्रकलेच्या क्षेत्रातील अजिंठा येथील निर्मिती विचारात घेता वास्तुशास्त्र दृककलेचे आश्रयदाते म्हणून ओळखले जाते. अजंठा येथील बौध्द शिल्पे अभिजात सारनाथ येथील शिल्पापेक्षा वेगळी आहेत. अजंठा येथील बौध्द मूर्तीमध्ये तत्कालिन सौंदर्यशास्त्रातील वैशिष्ट्ये, शरीराच्या प्रमाणाचे संकेत आणि महापुरुषांची उष्णीवादी लक्षणे इत्यादी बाबी दिसून येत असल्या तरी या मूर्ती अधिक भरीव आणि भौतिक वाटतात. भक्ताच्या तारण्यासाठी

अवलोकितेश्वराचे स्वर्गातून होणारे अवतरण बुध्दाचा परितोष, परिनिर्वाण, स्वतःची पत्नी व पुत्र यांच्या समोर भिक्षा मागण्यासाठी उभा असलेला बुध्द. दीपंकर जातक असे धार्मिक विषय अजंठा येथे चित्रीत करण्यात आले आहेत. ही शिल्पे केवळ कथाविवरण शैलीमुळे नव्हे तर मूर्ती कोरण्याकरीता वापरलेली पध्दती आणि त्यापेक्षा महत्वाचे म्हणजे निरनिराळ्या भावना आणि वृत्तींचा सुंदर अविष्कार या गुणामुळे उल्लेखनिय ठरली आहेत. दुय्यम शिल्पामध्येही राजेशाही नाग युगल लेण्याच्या कळसावरील शिल्प यक्ष व्दारपाल आणि त्याचे अनुचर जलदेवता आणि त्यांचे गबाळ अनुचर व ठेंगू लवाजमा इत्यादी दिव्य विश्वात घेऊन जातात .हे विश्व परलोकातील किंवा श्रेष्ठ लोकांतील असेल तरी ते मानवी भावनांनी ओतप्रोत भरलेले असल्यामुळे मानवीच भासतात. (०४ प्र.क्र.१९६) कला हे मानवाने स्वतः निर्मिलेले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करुन मानवाने स्वतः निर्मिती केलेली आढळते. या निर्मितीमधून मानवाची भावना प्रतिभा यांचे प्रगटीकरण होत असते आणि मानव समुहाची माहिती मिळते. कला अभ्यासावरुन त्या मानवसमुहाची प्रगती, तंत्रज्ञान, आचार विचार, सौंदर्यदृष्टी इतर समुहाशी असलेला संबंध तत्कालिन उद्योगधंदे याची माहिती मिळते. लिखित स्वरुपाचे पुरावे जरी मिळाले नाही तरी कला वरुन इतिहास संस्कृतीचे आकलन होते. (०२ प्र.क्र.८६)

सातवाहन काळात शिल्पशास्त्रीय दृष्ट्या लेण्याच्या भव्य अंतरंगाला सखोलता प्राप्त करुन देणारे एक सुंदर प्रयोजन दिसते.सातवाहन काळात यक्षाच्या आणि मानवाच्या मूर्तीत वरकरणी साधर्म्य दिसून येत असले तरी कुशाणकालीन मूर्तीपेक्षा त्या वेगळ्या आहेत. उठावात प्रगट होणाऱ्या स्त्री पुरुषांच्या मूर्ती मोजक्याच दागिन्यांनी नटवलेल्या आहेत. मूर्तीच्या अंगावर रेषेने दाखविण्यात येणाऱ्या पारदर्शक वस्त्रांना त्यांच्या चुन्या व कोपरे दाखविण्यास सुरुवात झाल्यानंतरच आकार आला. अवाढव्य असलेल्या आकृती सहजपणे आकाशातून उडत आहेत असे दाखविण्यासाठी या शिल्पकृती कमानीच्या बाह्यरेषेलगत कोरण्यात येत असत. बहुदा याच काळात मानवी शिल्पकृती अतुल सौदर्यापत पोहचल्या. त्या काळातील भक्तांनी आणि शिल्पकारांनी भगवान बुध्दाला मानवी स्वरुपात पाहणे पसंत केले. यातूनच महाराष्ट्रातील कान्हेरी येथील चैत्यगृहातील प्रांगणातील स्तंभाच्या पायावर आणि शीर्षावर बुध्दमूर्ती कोरली आहे. (०४ प्र.क्र.१९४)

### अजंठा येथील शिल्पसृष्टी :

औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगांव तालुक्यातील `अजिंठा` हे गांव आहे. अजिंठ्याच्या डोंगरात हीनयान आणि महायान पंथीय बौध्द धर्माच्या एकूण तीस लेण्या आहेत. या लेण्या जगप्रसिध्द आहेत. अजिंठ्याचा डोंगर या नावाने ओळखली जाणारी ही एक सह्याद्रीची रांग आहे. अजिंठा लेणीच्या परिसरातील शाखेस `मंदागिरी` हे नांव होते. त्यामुळेच अजिंठाच्या डोंगराचे प्राचीन नांव `मंदारगिरी` हे होते. अजिंठा या गावाचे प्राचीन नांव `अंजित` असे होते. बौध्द साहित्यात `अंचित विहार` असा उल्लेख आढळतो. येथील लेणी क्र. १७ मधील शिलालेखात येथील चैत्य अंचित नावाच्या मंत्र्याने कोरल्याचा उल्लेख आहे. या नांवावरुन `अंचित विहार` हे नांव रुढ झाले असावे. इ.स.च्या ७ व्या शतकात अंचित विहार हे दक्षिण भारतातील एक प्रमुख बौध्दपीठ गणले जात होते. याचा उल्लेख ह्यूएनत्संगाच्या प्रवास वर्णनातही आढळतो. (०७ प्र.क्र.३०२)

अजंठा लेण्याचे तीन स्थूल विभाग दिसतात. चैत्यगृहे, विहार आणि चैत्यमंदिरे. चैत्यगृहे पूर्वीप्रमाणे चाकाकार विधानाची त्यात स्तूप व क्वचित स्तूपावर बुध्दमुर्ती विहारामध्ये दालन आणि त्याभोवती निवासासाठी खोल्या, चैत्य मंदिरामध्ये विहाराच्या विधानाचा विस्तार करुन मागच्या भिंतीतील खोल्या मोठ्या करुन त्यात बुध्द प्रतिमा कोरलेल्या आहेत. यात स्तूप नाही. मूर्ती आहेत. (०५ प्र.क्र.५०) अजंठामधील चित्रकला, स्थापत्यविकास तसेच शिल्पकाम, बुध्दाच्या मूर्ती यासाठी प्रसिध्द आणि महत्वाचे आहेत. अजंठा येथील शिल्पकाम उत्तर भारतातील बौध्द शिल्पापेक्षा थोडे वेगळे आहे. मूर्तीमधला नाजूकपणा कमी झाला असून अजंठा येथील मूर्ती भरीव, सौष्ठवपूर्ण आढळतात. चेहऱ्यावरचे भावही शांत व गंभीर आहेत. बुध्दाच्या जीवनातील प्रसंग, जातककथा, अवलोकितेश्वराचे अवतरण अशी शिल्पे लक्ष वेधून घेतात. जातककथा किंवा गौतमाच्या जीवनातील प्रसंग याची कथा माहित नसले तरी शिल्पांचा आस्वाद कमी होत नाही आणि शिल्पांच्या माध्यमातून कथा समजतेच. तसे हे शिल्पपट कथाविवरण करणारेच आहेत. (०६ प्र.क्र.१२७)

**लेणी क्र.१ मधील शिल्पे -** लेणी क्र. १ मध्ये चैत्य व विहार अशा संमिश्र स्वरुपाची वास्तू आहे. यातील मुखदर्शनातील स्तंभावर बुध्दांच्या जीवनातील प्रसंग व हत्तीच्या साठमारीचे दृष्ये असे विविध विषय शिल्पबध्द केले आहेत. मुख्य दरवाजाच्या गणेशपट्टीच्या टोकाला गंगायमुनाच्या मूर्ती आहेत. येथील भिंतीना समांतर स्तंभाच्या रांगा आहेत. याच्या स्तंभशिर्षावर उडत्या गंधर्वाची शिल्पे कोरली आहेत. आतील गाभाऱ्यात गौतम बुध्दाची मोठ्या आकाराची भव्य मूर्ती आहे. गर्भगृहातील ही मूर्ती जगातील सर्व मूर्तीपैकी सर्वश्रेष्ठ आहे. या मूर्तीचे वैशिष्टय असे आहे की, आपण मूर्ती पाहण्याची जागा बदलली की मूर्तीचे हावभावसुध्दा बदलतात. समोरील बाजुने मूर्तीकडे पाहिल्यास मूर्तीचा चेहरा तपस्या आणि शांतीचा हावभाव प्रदर्शित करतो. तर उजव्या बाजूने पाहिल्यास मूर्तीचा चेहरा किंचीत हास्यमय आणि प्रसन्न दिसतो. डाव्या बाजूने पाहिल्यास शांत व दुःखी चेहरा दिसतो. धम्मचक्र प्रवर्तन अवस्थेत असलेल्या या मूर्तीच्या दोन्ही बाजूस चिवर धारण केलेले काही शिल्पे आहेत. उजव्या बाजूकडील शिल्प वज्रपाणीचे आहे तर खालच्या बाजूस धम्मचक्र आणि हरिण आहेत. जे सारनाथ येथील प्रथम प्रवचनाचे प्रतिक आहेत. सारनाथला त्या काळात `मृगदाव` असेही म्हंटले जात होते. बुध्दाच्या अंगावरील वस्त्राचे टोक डाव्या हातावर आले आहे तर बाकीचे वस्त्र अंगाला लपटलेले आहे. येथे तिसऱ्या स्तंभावर चार हरिणींचे शरीर भिन्न परंतु सर्वांचे तोंड मात्र एकच आहे. हे शिल्प अत्यंत कोरीव आणि सुबक असल्याने सजीव वाटते.

**लेणी क्र.२ मधील शिल्पे** : या लेणीमध्ये व्याख्यान मुद्रेतील भव्य गौतम बुध्दाची मूर्ती आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूला चिवर घेतलेल्या दोन प्रतिमा कोरलेल्या आहेत. डाव्या बाजूकडील प्रतिमा पद्मपाणिची आहे. तसेच आतील बाजूस `पचिक व हारिती` च्या मूर्ती आहेत. त्याच्याखाली सुंदर आकर्षक दृष्य कोरलेले आहे. उजव्या बाजूस गुरुच्या हातातील छडीला घाबरुन तीन शिष्य ध्यानपूर्वक अभ्यास करीत आहेत. गुरुनी छडी दूर करताच दोन शिष्य रागात आले आहेत. त्यापेक्षा दूर अंतरावर पाच शिष्य मेंढीशी खेळण्यात मग्न आहेत. या लेणीमध्ये दोन भव्य यक्ष मूर्ती आहेत. त्यांच्या हाता शंख व पद्म असल्याने शंखनिधी व पद्मनिधी दाखविण्याचा प्रयत्न केला असावा.

**लेणी क्र.४ मधील शिल्पे :** या लेणीतील मुख्य दरवाजाच्या व्दारशाखेच्या दोन्ही बाजूस व्दारपालिकेसमान उभी एक स्त्री मूर्ती आहे. व्दारशाखेच्या सिरदलावर बुध्दाच्या कोरीव मूर्ती आहेत. दरवाजाच्या उजव्या बाजूस अवलोकितेश्वरांची स्तुतीमूर्ती असून जवळच बौध्दीसत्वाची जटामुकुटाच्या स्वरुपातील एकध्यानी बुध्दाची मूर्ती धम्मचक्र प्रवर्तन मुद्रा अवस्थेत कोरली आहे आणि भक्तगण त्यांची पूजा करीत आहेत. गर्भगृहात गौतम बुध्दाची व्याख्यानमुद्रा अवस्थेतील मोठी मूर्ती आहे. त्यांच्या दोन्ही बाजूस पद्मपाणी आणि वज्रपाणी आहेत. गर्भगृहाच्या दरवाजावरही कांही बुध्द मूर्ती आहेत.

**लेणी क्र.६ मधील शिल्पे :** या लेणीतील गर्भग्रहातील असलेली बुध्दमूर्ती पाठीमागील भिंतीपासून वेगळी केलेली आहे. लेणीच्या प्रांगणात दोन्ही बाजूस एक एक प्रकोष्ठ असून दर्शनी भागात बुध्दाच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. प्रांगणाच्या बाहेरच्या बाजूस वरच्या बाजूस मंडप असून त्यामध्ये बुध्द प्रतिमा आहेत. मंडपाच्या पाठीमागील बाजूस बुध्दाची व्याख्यानमुद्रा अवस्थेतील एक प्रतिमा आहे. गभ्रगृहाच्या दोन्ही बाजूस उपगर्भगृह असून त्यामध्येही बुध्द प्रतिमा आहेत.

**लेणी क्र. ७ मधील शिल्पे :** लेणीच्या पुढील भागात अर्धकमल व पशूंचे शिर कोरलेले असून आतील गर्भगृहात आसनस्थ बुध्द मूर्ती आहे. गर्भगृहाच्या भिंतीवर बुध्दाच्या सहा मूर्ती कोरल्या असून बुध्द उभे असून त्यांचा हात वरदमुद्रेत आहे. व्दारशाखा व शिरदल यावरही बुध्दाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. अंतराळातील डाव्या व उजव्या भिंतीवर श्रीवस्तीचा चमत्कार हे शिल्प आहे.

**लेणी क्र. ९ मधील शिल्पे :** या लेणीच्या भिंतीवर वरदहस्त मुद्रेतील बुध्दाच्या दोन भव्य प्रतिमा कोरलेल्या आहेत. त्या प्रतिमा नंतरच्या काळातील असाव्यात.

**लेणी क्र. ११ मधील शिल्पे :** या लेणीच्या प्रवेशव्दारावर सिंहमुख आहे. लेणीतील स्तंभशिर्षावर कमलदलसहित पूर्णघट आहे. लेणीतील स्तूपाच्या समोरील बाजूस बुध्दाची प्रवचन देत असलेली अर्धवट अवस्थेतील मूर्ती आहे. येथे चार धड व एक चेहरा असलेले हरीणाचे शिल्प कोरलेले आहे.

**लेणी क्र. १५ मधील शिल्पे :** या लेणीच्या सिरदलावर शिल्पांकन आहे. येथील स्तंभविरहित मंडपाच्या आतील गर्भगृहात पाठीमागील भिंतीत बुध्दांची सिंहासनरुढ मूर्ती आहे.

**लेणी क्र.१६ मधील शिल्पे** : या लेणीच्या प्रवेशव्दाराच्या दोन्ही बाजूस मोठ्या आकाराचे हत्ती कोरलेले आहेत. समोरच नागराज आणि नागराणीचे शिल्प आहे. गर्भग्रहात बुध्दाची प्रवचन करीत असलेली आसनस्थ अवस्थेतील मूर्ती आहे.

**लेणी क्र.१७ मधील शिल्पे :** या लेणीतील पाठीमागील स्तंभावर आठ वाघ एकमेकांच्या पाठीला पाठ लावून बसलेले आहेत. मात्र त्यांची तोंडे फक्त चारच दाखविली आहेत. लेणीच्या प्रवेशद्वारावर दगड तासून सज्जा बनविलेला असून त्या सज्जात पत्रललना, बुध्दाच्या मूर्ती, व्दारपालिका पत्रभंग रचना आणि कमलदलाच्या आकृती आहेत. दोन्ही किनाऱ्याच्या मकराच्या वर उभी असलेल्या स्त्रीची अत्यंत सुंदर आकृती आहे. गर्भगृहात बुध्दांची व्याख्यान मुद्रेतील एक मूर्ती असून बाजूला वज्रपाणी आणि पद्मपाणी आहेत. याशिवाय दोन प्रतिमा असून एका प्रतिमेच्या हातात भिक्षापात्र आहे. लेणीतील स्तंभशिर्षावर जमीनीकडे पहात असलेल्या मनुष्याकृती आहेत.

**लेणी क्र. १९ मधील शिल्पे :** ही लेणी चैत्यगृह स्वरुपाची असून या चैत्यगृहात स्तूप व बुध्दांची मूर्ती आहे. बुध्दांची मूर्ती स्तूपाच्या वर आली असून अलंकरन वाढलेले दिसते. लेणीतील स्तंभावर विविध प्रकारचे नक्षीकाम केलेले आहे. प्रदक्षिणा पथावर चित्र व छतावर लाकडी प्रतिकृती आहे. या लेणीतील मंडपात बुध्दमूर्ती आहे. चैत्यच्या प्रवेशव्दारावरील स्तंभावर मोठमोठे सुडौल यक्ष आहेत. या मूर्तीच्या दोन्ही बाजूस हातात उडता मुकुट पकडलेल्या काही प्रतिमा आहेत. मुकुट डोक्याच्या थोडे वरच्या बाजूला आहेत. मुख्य दरवाजाच्या डाव्या बाजूस बाहेरील भिंतीवर बुध्दाची वरदमुद्रेतील प्रतिमा कोरली आहे. त्यांच्या पायाजवळ एक भक्त झुकलेल्या अवस्थेत आहे तर दुसऱ्या बाजूला स्त्री असून तिच्या हातात घागर आहे. हे शिल्प महापरिनिर्वाणचे असून ही बुध्दाची मूर्ती निर्वाण अवस्थेतील आहे. चेहऱ्यावर अत्यंत शांत भाव आहे.

जमीनीवर शोकाकूल अनुयायी आहेत. अत्यंत गांभीर्यपूर्ण असे अजोड शिल्प आहे. डाव्या बाजूकडील भिंतीवर नाग दांपत्याच्या शिल्प आहे. आसनावर नागराज मानवरुपी बसलेला आहे. डोक्यावर फार मोठा नागफणा उठावात कोरलेला आहे. नागराणी शेजारीच बसलेली आहे. नागराजाच्या बाजूला चिवरीधारी सेविका आहे. नागराणी थोडीशी कललेली व नागराजाकडे पहात आहे. नागराजाचा चेहरा अस्वस्थ, शांत भाव दर्शवतो. हे शिल्प अतिशय प्रमाणबध्द स्वरुपात कोरलेले आहे. त्यावर आवश्यकते अलंकारही दिसतात. नागराणीच्या डोक्यावरही सर्पमुखाचे छत्र आहे. तिच्या डाव्या हातात कमलपुष्प आहे. मुख्य दरवाजाच्या उजवीकडे बुध्द कपिलवस्तू येथे यशोधरा व राहूल यांच्या समोर भिक्षा मागत असलेली दृष्ये कोरलेले आहेत. लेणीतील स्तंभाच्या वरच्या भागावर बुध्दमूर्ती कोरल्या आहेत. स्तूपाच्या पीठिकावर अलंकृत करुन तेथील अंडाकृत भागावर अभयदान अवस्थेत असलेली बुध्दमूर्ती कोरली आहे. हार्मिकेच्या वरतीही धम्मचक्र प्रवर्तन मुद्रेतील बुध्दाची प्रतिमा कोरलेली आहे.

**लेणी क्र.२० मधील शिल्पे :** या लेणीमध्ये प्रवेशव्दाराच्या डाव्या बाजूस असलेल्या खिडकीच्या वरती एक बुध्दाची मूर्ती आहे तर गर्भगृहात धम्मचक्र प्रवर्तन मुद्रेत बुध्दमूर्ती आहे.

**लेणी क्र.२१ मधील शिल्पे :** या लेणीमधील प्रांगणात आकर्षक शिल्प आहेत. येथील स्तंभाच्या वरच्या दिशेला मकर आणि अर्धकमल कोरले आहेत. लेणीच्या पाठीमागील भिंतीवर प्रवचन करीत असलेली बुध्द मूर्ती आहे. येथील चैत्यगृहात बुध्दाची मूर्ती परिनिर्वाण मुद्रेतील आहे. तसेच आतील स्तूपावर `मार` ही व्यक्ती गौतम बुध्दांना आपल्या उद्देशापासून परावृत्त करीत असल्याचे शिल्प आहे.

**लेणी क्र. २२ मधील शिल्पे :** या लेणीमधील पाठीमागील भिंतीवर आणि उजव्या बाजूव्या भिंतीवर गौतम बुध्दाची बैठी मूर्ती आहे. गर्भगृहाच्या आतील बाजूस दोन चिवरी धारण केलेले सेवक आणि गौतम बुध्दाची मूर्ती आहे.

**लेणी क्र. २४ मधील शिल्पे :** या लेणीमधील पाठीमागील भिंतीवर एक प्रलंबपाद आसन अवस्थेत बुध्दाची मूर्ती कोरलेली आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूस उडत्या अवस्थेतील प्रतिमा आहेत. लेणीतील स्तंभावर सुंदर नक्षीकाम आढळते. स्तंभशिर्षावर गुलदस्ता पध्दतीचे कोष्टक आहेत.

**लेणी क्र. २६ मधील शिल्पे :** या लेणीच्या दर्शनी भागावर बुध्दाच्या विभिन्न प्रकारच्या मूर्ती कोरल्या आहेत. चैत्याच्या दोन्ही बाजूस यक्षाच्या मूर्ती आहेत. यक्षाच्या बाजूला बुध्दांची वरदहस्त अवस्थेतील प्रतिमा कोरली आहे. चैत्यगृहाच्या दरवाजावर मिथून शिल्प आहे. प्रवेशव्दाराच्या स्तंभाच्या वरील भागावर स्त्री प्रतिमा कोरल्या आहेत. आतील स्तूपाच्या खालील भागात बुध्दांची भव्य मूर्ती कोरली आहे. याशिवाय विभिन्न स्वरुपाच्या बुध्दांच्या मूर्ती आढळतात. अंडाकार भागात उडत असलेल्या अप्सरांचे शिल्प आहे. या लेणीच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर बुध्दाच्या महापरिनिर्वाणाचे शिल्प कोरले आहे. संपूर्ण भिंतच या शिल्पाने व्यापली आहे. हे अत्यंत सुंदर आणि अजोड असे भव्य शिल्प आहे. गौतमबुध्द उजवा हात उशाला घेऊन झोपलेले हे विशाल शिल्प आहे. डावा हात अंगावर घेतला आहे. त्यांचे डोके ज्या उशीवर आहे ती उशी वजनामुळे थोडीशी दबलेली दाखवण्यात शिल्पकार यशस्वी झाले आहेत. या शिल्पांची लांबी जवळजवळ ७ मीटर इतकी आहे. बुध्दांच्या मंचकाच्या पायाशी बुध्द अनुयायी अत्यंत दुःखी अवस्थेत बसलेले आहेत. त्यामधील कांहीजण हात हनुवटीखाली घेवून बुध्दांच्या चेहऱ्याकडे दीनवाणे पहात आहेत, तर कांहीजण जमीनीकडे पहात अश्रू ढाळत आहेत. बुध्दांच्या चेहऱ्यावरील शांत भाव दुःख आणि सुख याला जिंकल्याचे जाणवते. बुध्दांना स्वर्गात नेण्यासाठी वरच्या बाजूला गंधर्व व अप्सरांचे थवे आहेत. येथील दुसऱ्या शिल्पात बुध्दांचा प्रिय शिष्य आनंद शोकसंतप्त दाखविला आहे. तिसरे दृष्य `मार`यांचे आहे. बुध्द बोधिवृक्षाखाली भूमिस्पर्श करीत आहेत. खाली माराच्या सात कन्या बुध्दांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांना या कार्यात यश मिळालेले नाही. माराच्या कन्या अत्यंत सुंदर व सुशोभित दाखवल्या आहेत. त्यांची सुंदर केशरचना आणि भरपूर अलंकार परिधान केलेले आहेत. या कन्या आपल्या शारिरीक सौंदर्याच्या जोरावर बुध्दांचे मन विचलित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सात कन्यापैकी पाच कन्या बसलेल्या आणि दोन उभ्या आहेत आणि स्वतः मार त्यांच्या उजव्या बाजूस उभा आहे. कुमार सिध्दार्थाच्या दोन्ही बाजूस मार यांचे सैन्य असून हत्तीना सिध्दार्थावर हल्ला करण्यासाठी विवश करण्यात येत आहे. परंतु हत्तीने सिध्दार्थावर हल्ला न करता भीतीने आपली सोंड मागे घेतली आहे. त्यामुळे शेवटी मार निराश झाल्याचे दाखविले आहे.

**निष्कर्ष :**

१. अजंठा येथील डोंगररांगा ज्वालामुखीच्या उद्रेकापासून निर्माण झालेल्या बेसॉल्ट नांवाचा घट्ट बांधीव पोताचा शिल्पखंडाचा दगड आहे.तो मूर्ती घडविण्यासाठी योग्य आहे.

२. येथील सापडलेला शिलालेख व इतर पुराव्याच्या सहाय्याने येथील लोकांची निर्मितीचा कालखंड इ.स.पू.१५० ते इ.स. ४५० सुमारास मानला जातो.

३. शिल्पीला भूशास्त्राची अचूक माहिती व ज्ञान होते.

४. अजंठा येथील शिल्पे भरीव अत्यंत सौष्ठवपूर्ण आणि आकर्षक आहेत.
५. शिल्प काम करणारे शिल्पी निष्णात होते.
६. अजंठा येथील शिल्पकाम उत्तर भारतातील बौध्द शिल्पापेक्षा थोडे वेगळे आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**


१. भिडे गजानन, प्राचीन भारताचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर २००२
२. जोशी माधवशास्त्री, भारतीय संस्कृती कोश, अनमोल प्रकाशन खंड ७ वा- २००४
३. कळसेकर टी.एल. महाराष्ट्राचे खजुराहो-खिद्रापूर, काळशेखर प्रकाशन, पुणे -१९९७
४. डॉ. अ.रा.पाठक संपादक, महाराष्ट्र इतिहास, प्राचीन काळ, स्थापत्य व कला ,सचिव पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मुंबई -१९६७
५. माटे म.श्री., प्राचीन कलाभारती,कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे -३०- १९९८
६. डॉ. शुभांगणा अत्रे व इतर, महाराष्ट्र संस्कृती, डायमंड प्रकाशन पुणे मार्च २०११.
७. डॉ. अनिल कटारे, प्रा. विजया साखरे, भारतीय कलेचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, जानेवारी २००८